INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

January-February-March-2023 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol. 9, Issue-4

## Multidisciplinary Issue



Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's M.S.G. Arts, Science & Commerce College,
Malegaon (Camp), Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

## Editorial Board

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar.
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Tejesh Beldar, **Nashikroad (English)**
Dr. Gajanan Wankhede, **Kinwat (Hindi)**
Mrs. Bharati Sonawane, **Bhusawal (Marathi)**
Dr. Rajay Pawar, **Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Prof. Mohan S.** - Dean faculty of Arts, Delhi University, **Delhi, India**
- **Prof. Milena Brotaeva** - Head, Classical East Department, Sofia University, **Sofia, Balgeria**
- **Dr. R. S. Sarraju** – Center for Translation Studies, University of Hydeabad, **Hydrabad, India**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik. **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon **[M.S.] India**
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sanjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari **[M.S.]**
- **Prof. Vijay Shirsath**- Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.] India**
- **Dr. P. K. Shewale** - BoS Member (SPPU), MGV's LVH College, Panchavati-Nashik **[M.S.] India**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.] India**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.] India**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.] India**
- **Prof. K. M. Waghmare** - Librarian, Anandibai Raorane College, Sawantwadi **[M.S.] India**
- **Prof. Vidya Surve-Borse**- MGV's LVH Arts, Sci. & Com.College, Panchavati-Nashik **[M.S.] India**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna Kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS, Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** - BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**- BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali,** HoD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** - Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** - M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by -**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, **Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email :** swatidhanrajs@gmail.com **Website :** www.researchjourney.net **Mobile :** 9665398258

# INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | Species of the Myxomycetes Recorded from Patnadevi Forest Dist. Jalgaon, Maharashtra (India) | N. V. Chimankar | 05 |
| 2 | A Study of Women's Marginalized Desires with reference to the Short Stories of Githa Hariharan and Kate Chopin | Dr. Vidya Verma, Dr. Yogita Verma | 10 |
| 3 | Diaspora Literature and Methods of Writings | Dr. Waman Jawanjal | 15 |
| 4 | Cultural Impact and Reception of the Television Series Dexter in Indian and Western Society | Dr. Ashish Pandey | 20 |
| 5 | A Study of Spirituality among Male and Female College Student | Dr. Kalpana Vitore | 26 |
| 6 | How the COVID-19 Challenges become the Opportunities for Sustainable Entrepreneurship. | Babli Jha, Manisha Bhosale | 29 |
| 7 | E-Library as Learning Resources | Mr. Lalit Sonawane, Dr. Anil Chaudhari | 34 |
| 8 | Socio-Legal Issues of Cyber Security in India | Dr. N. D. Jadhav | 39 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 9 | महादेवी वर्मा के रेखाचित्रों में पशु-पक्षियों का स्थान | डॉ. सरोज सोलंकी | 44 |
| 10 | अंतिम दशक के हिंदी उपन्यासों में चित्रित ग्रामिण मजदूर | डॉ. भिमराव मानकरे | 46 |
| 11 | भंगी दरवाजा उपन्यास में समकालीन राजनीति का चित्रण | डॉ. अशोक पवार | 51 |
| 12 | 'रेहन पर रग्घू' उपन्यास पर भूमण्डलीकरण का प्रभाव | डॉ. सरला तुपे | 54 |
| 13 | जाति के अहं ने मानवता का गला घोट दिया | प्रा. हिरा पोटकुले | 59 |
| 14 | स्वातंत्र्योत्तर हिंदी काव्य में लक्ष्मण का चरित्रांकन | डॉ. व्ही. डी. सूर्यवंशी | 63 |
| 15 | सुरजपाल चौहान के काव्य में डॉ. आंबेडकर के विचार | डॉ. अशोक पवार | 66 |
| 16 | २१ वीं सदी की हिंदी भाषा पर आधुनिक तकनीक का प्रभाव | डॉ. सूरज चौगुले | 70 |
| | **मराठी विभाग** | | |
| 17 | साहित्याची संस्कृती आणि संस्कृतीचे साहित्य | डॉ. अनमोल शेंडे | 75 |
| 18 | लोकनाट्य तमाशा : संकल्पना व स्वरूप | डॉ.नितीन मोटे | 80 |
| 19 | भाऊ पाध्ये आणि भालचंद्र नेमाडे यांच्या कादंबरीतील साम्य-भेद याचा शोध | सुहास पाटील | 86 |
| 20 | संत तुकाराम महाराज व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या साहित्यातील श्रममूल्यांची जाणीव | डॉ. मनोज ढोणे | 93 |
| 21 | समकालीन मराठी कविता | डॉ. विजय केसकर | 98 |
| 22 | 'महानिर्वाण' : निर्वाणाचे हास्य-शोकात्मक नाट्य | डॉ. नितीन मोटे | 107 |
| 23 | डॉ. अनिल अवचट यांच्या लेखनाची वाङ्मयीन गुणवत्ता | डॉ. किरण सालोटकर | 112 |
| 24 | २१ व्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरीतील शेतकरी: समाज व संस्कृती | डॉ. आप्पा माने | 118 |
| 25 | ग्रामीण व्यवस्थेतील दलित स्त्रीचे शोषण – रापनवेळ | डॉ. राजेंद्र करनकाळ | 123 |
| 26 | वसुंधरा पटवर्धन यांचे नाट्यलेखन | डॉ. चंद्रकांत कांबळे | 127 |
| 27 | वैचारिक लेखन : संकल्पना स्वरूप [illegible] | [illegible] | [illegible] |

# वसुंधरा पटवर्धन यांचे नाट्यलेखन

**डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे**
विभागप्रमुख, मराठी विभाग
किसन वीर महाविद्यालय, वाई, जि.सातारा
भ्रमणध्वनी – ९४०३३४४५७६
मेल- kamble.chandrakant971@gmail.com

वसुंधरा पटवर्धन या मराठी साहित्यप्रेमी रसिकांना परिचित आहेत, त्या विशेषकरून कथालेखिका म्हणून. परंतु कथाकार म्हणून महत्वपूर्ण कामगिरी बजावणाऱ्या वसुंधरा पटवर्धन यांनी 'नाटक' हा वाङ्मयप्रकारही हाताळला आहे. कथेच्या प्रांतात त्यांना जसे यश मिळाले, त्याप्रकारचे यश त्यांना नाट्यलेखनाच्या प्रांतात जरी मिळाले नसले, तरी त्यांच्या नाट्यलेखनाला दुय्यम मानता येणार नाही. 'हिरकणी' हे एकमेव नाटक व 'चारमिनार' हा एकांकिकासंग्रह लिहिणाऱ्या वसुंधरा पटवर्धन यांनी मानवी जीवनातील नाट्य आपल्या नाट्यलेखनातून अचूकपणे टिपले आहे.

'हिरकणी' या नाटकाचे कथानक बाबीकाका या वयोवृद्ध व्यक्तिरेखेच्या भावजीवनाशी संबंधित आहे. दोन मुलांना जन्म देऊन बाबीकाकांची पत्नी जेंव्हा मृत्यू पावते, तेव्हा आपल्या मुलांना सावत्र आई नको म्हणून ते दुसरे लग्न करण्याच्या भानगडीत पडत नाहीत. आपल्या मुलांमध्ये ते रमण्याचा प्रयत्न करतात. नंतर मुले मोठी होतात, त्यांचे विवाह होतात, घरी सुना येतात, तेव्हा आपल्या कर्तव्यपूर्तीचे समाधान बाबीकाकांना वाटते. परंतु कर्तव्यदक्ष असणारे बाबीकाका पत्नीच्या मृत्यूनंतर मात्र आपल्या भावनेला आवर घालू शकत नाहीत. त्यांचे एका स्त्रीशी प्रेमसंबंध जुळतात व त्या दोघांना सुमन नावाची मुलगी होते. सुमनच्या आईच्या मृत्यनंतर आपल्या हयातीत सुमनचे लग्न व्हावे, तिचा संसार उभा राहावा, अशी त्यांची मनोमन इच्छा असते. तिच्या भल्यासाठी त्यांचा जीव तळमतो. वयोवृद्ध बाबीकाकांचे विक्षिप्त वागणे पाहून कुटुंबात ताणतणाव निर्माण होतो, परंतु त्यांच्या विक्षिप्त वागण्याचा उलगडा काही काळानंतर होतो.

विवाह न करता निर्माण झालेल्या संततीला समाजमान्यता नसली, तरी बाबीकाका आपली जबाबदारी टाळत नाहीत. विश्वनाथ व मनोहरला पित्याची माया देणारे बाबीकाका सुमनवरही तेवढीच किंबहुना अधिक माया करतात. आयुष्याच्या उत्तरार्धात पराधीन असलेल्या वयोवृद्ध बाबीकाकाना सुमनला काही देणे शक्य नसल्याने, घरातील काही वस्तू चोरून देण्याचा प्रयत्न करतात. ते म्हणतात, "तिचं लग्नकार्य मला केलं पाहिजे. त्या लग्नासाठीच मी पैसे जमवत होतो. मग मला कोणी चोर म्हणो, दरोडेखोर म्हणो, ढोंगी म्हणो, काही म्हणो. पण माझ्या पोटच्या मुलीचं लग्न व्हावं, तिचा संसार उभा राहावा, तिनं संभावित जीवन जगावं, एवढी माझ्या जीवाची तळमळ आहे." १ सुमनच्या भल्यासाठी घरातील पैशांची व वस्तूंची केलेली चोरी बाबीकाकाना चोरी वाटत नाही. आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी ते धडपडताना दिसतात.

सुमनच्या आईवर व सुमनवर बाबीकाकांचे प्रेम व माया असली, तरी सामाजिक बंधनामुळे त्यांना ती उघडपणे व्यक्त करणे कठीण जाते. परंतु प्रेम आणि सामाजिक बंधन या कात्रीत सापडलेले बाबीकाका आपल्या नात्याला महत्व देतात. सुमनच्या आईवर प्रेम असूनही सामाजिक बंधनामुळे व्यक्त करता न आलेल्या बाबीकाकाना आपल्या मुलीचे रीतसर लग्नच व्हावे, अशी इच्छा असते.

आपल्या वडिलांचे एका स्त्रीवर प्रेम होते व त्यांना सुमन नावाची मुलगी आहे, हे जेव्हा काही काळानंतर मनोहरला व त्याच्या पत्नीला म्हणजेच अलकाला समजते, तेव्हा त्यांना बाबीकाकांच्या आचरट वागण्याचा संताप येतो. ते घर सोडून जाण्यास तयार होतात. याच्याउलट बाबीकाकांचा थोरला मुलगा विश्वनाथ व त्याची पत्नी पार्वती हे मात्र बाबीकाकांच्या चमत्कारिक वागण्यातील प्रत्येक गोष्ट समजून घेऊन,

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol.9, Issue – 4 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
Jan.-Mar.-2023

त्यांच्यावर माया करतात. आपल्या वडिलांना अपराध्यासारखे वाटू नये, म्हणून त्यांचे प्रेमप्रकरण व त्यांना असलेली सुमन नावाची मुलगी माहीत असूनही, त्याकडे ते कानाडोळा करतात. बाबीकाकांच्या चमत्कारिक वागण्याचा तिरस्कार करणारी व सुमनकडे तुच्छतेने पाहणाऱ्या अलकाचे सुमनच्या प्रेमळ वागण्याने मतपरिवर्तन होते. ती बाबीकाकाना व सुमनला कुटुंबातील घटक मानण्यास तयार होते व नाटकाचा शेवट गोड होतो.

ज्या काळात लेखिकेने प्रस्तुत नाटकाचे लेखन केले, तो काळ लक्षात घेता, त्या काळात विवाहसंस्थेला प्राधान्य दिले जात होते. त्यामुळेच त्यांच्या साहित्यातून येणारी स्त्रीपात्रे नवऱ्याचा जाच सहन करणारी, नवऱ्याच्या सुखासाठी सवतीला स्वीकारणारी, त्यांच्याकडून प्रेमाची अपेक्षा करणारी व खाली मानेनी जगणारी दिसून येतात. भारतीय स्वातंत्र्यानंतर स्त्रीला शिक्षण मिळाले, तिला स्वत्वाची जाणीव झाली, पुरुषांबरोबर आपलेही स्थान महत्वाचे असल्याचे तिला कळू लागले, हे सारे बदल होऊनही लेखिकेच्या लेखनातून स्त्रियांप्रमाणे पुरुषही रूढी व परंपरांना झुगारून देताना दिसत नाहीत. विवाहबाह्य प्रेमातून निर्माण झालेल्या संततीला समाजमान्यता नाही, त्यामुळे सुमनचे लग्नच व्हावे, अशी बाबीकाकांची इच्छा असते. विचार आणि भावना यांचा संघर्ष बाबीकाकांच्या मनात चालतो व शेवटी भावनेचा विजय होतो. प्रेमासाठी विधूर बाबीकाकाना सुमनची आई चालते, परंतु पत्नी म्हणून ती उघडपणे चालत नाही. एकूण काय, तर बाबीकाकांच्या मनावर नैतिक –अनैतिकतेचा व परंपरेचा किती पगडा होता हे ध्यानात येते. स्वातंत्र्योत्तर काळात विवाहसंस्थेला आलेली अवकळा अनेक स्त्री-नाटककारांनी मांडली असली, तरी वसुंधरा पटवर्धन मात्र त्याला अपवाद आहेत. त्यांनी आपल्या नाटकातून व एकूणच साहित्यातून विवाहसंस्थेचा उदोउदो केला आहे. या नाटकाचे कथानक मानवी मूल्य व सामाजिक संकेतावर आधारित आहे. प्रस्तुत नाटकातील व्यक्तिरेखांचे स्वभावविशेष वसुंधराबाईना सूक्ष्मपणे टिपता आले असले, तरी त्याला नाट्यरूप मात्र देता आले नाही. त्यामुळे हे नाटक काहीसे ढोबळ व साचेबंद झाले आहे.

वसुंधरा पटवर्धन यांच्या 'हिरकणी' या नाटकाचे शीर्षक हे रूपकात्मक आहे. प्रस्तुत नाटकाच्या शीर्षकासंबंधी वसुंधरा पटवर्धन लिहितात, "या नाटकाची आम्ही दोन नावे ठेवली आहेत. एक पाळण्यातले व दुसरे व्यवहारातले. पाळण्यातले नाव आहे 'मोहमाया' व हाक मारण्याचे नाव आहे 'हिरकणी' " २ 'मोहमाया' हे शीर्षक लेखिकेने प्रस्तुत नाटकाला दिले असते, तर ते अधिक उचित ठरले असते. परंतु 'हिरकणी' हे नाव अन्वर्थक नाही असे म्हणता येणार नाही . कारण 'हिरकणी' हे शीर्षक सुमन या व्यक्तिरेखेशी संबंधित आहे. सुमन हे पात्र नाटकाच्या प्रारंभापासून येत नसले, तरी ते वाचकांचे लक्ष वेधून घेते. हिरकणीचे तेज, सौंदर्य व प्रकाश सुमनच्या व्यक्तीमत्वात प्रतिबिंबित झाला असल्यामुळे प्रस्तुत नाटकाचे शीर्षक अन्वर्थक आहे, असे म्हणता येईल.

प्रस्तुत नाटकाची भाषाशैली ही साधी, सोपी व ओघवती आहे. सुमन या तरुणीच्या तोंडी येणारी भाषा ही अधिक प्रौढ वाटत असली, तरी त्यामुळे नाटकाला कोठे बाधा येत नाही. हे नाटक कौटुंबिक जीवनावर आधारित असल्याने, लेखिकेने नेहमीच्या वापरातील राग, लोभ, प्रेम, मत्सर व्यक्त करणारी घरगुती भाषा वापरली आहे. नाटकातील भाषेसंबंधी प्रा.ना.सी.फडके म्हणतात, " ती फारशी काव्यमय तर नसावी आणि उलट अगदी बोलण्यातली दिसेल अशीही नसावी, कृत्रिमता व प्रत्यक्ष यांचे चतुर मिश्रण तिच्यात असावे. तिचा नाद रोजच्या भाषेच्या नादासारखा वाटावा, पण तिचा दिखाऊ डौल मात्र काव्याला शोभेलसा असावा."३ 'हिरकणी' या नाटकाची भाषा फडके यांनी सांगितलेल्या तंत्राजवळ जाणारी आहे. कारण प्रस्तुत नाटकातील भाषेत फारशी कृत्रिमता, दिखाऊपणा व काव्यमयता दिसून येत नाही.

'हिरकणी' या नाटकाची कथावस्तू ही नायकाशी संबंधित आहे. कारण नाटकाच्या शेवटी नायकाला फलप्राप्ती होते. गो.के. भट म्हणतात, " नाटकात जे घडते त्यादृष्टीने विचार केला, तर नाट्यवस्तू म्हणजे एखाद्या

विशिष्ट फलाच्या उदिष्टाच्या प्राप्तीसाठी नायकाने केलेली क्रिया असे म्हणता येईल."[४] बाबीकाकाना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, परंतु अखेर त्यांना घरची मंडळीही मिळते व सुमनचाही प्रश्न निकाली निघतो. लेखिकेने बाबीकाका या विशिष्ट प्रकृतीच्या व्यक्तीच्या अंतर्मनाचा शोध घेऊन माणसामधला माणूस शोधला आहे.

वसुंधरा पटवर्धन यांच्या 'हिरकणी' या नाटकाच्या विवेचनानंतर त्यांच्या 'चारमिनार' या एकांकिकासंग्रहाचा विचार करता येईल. कथालेखिका म्हणून मान्यता पावलेल्या वसुंधराबाईनी नाटकाबरोबर एकांकिकांचे लेखनही केले आहे. आपल्या ठराविक मध्यमवर्गीय कक्षेत जगून, त्यांनी मध्यमवर्गीय स्त्रीजीवनाचा शोध विविध पातळ्यांवर घेण्याचा प्रयत्न केला आहे. कथेतील संवाद सफाईदारपणे लिहिणाऱ्या वसुंधराबाईना नाटकात त्याचा उपयोग करून घेणे सोयीचे झाले आहे. त्यामुळे त्यांचे नाट्यलेखन हे अत्यल्प असले, तरी त्यातील संवाद हे परिणामकारक व नाटकाची गती साधणारे आहेत.

'चारमिनार' ही वसुंधरा पटवर्धन यांचा 'हिरकणी' या नाटकाप्रमाणेचं एकमेव एकांकिकासंग्रह आहे. या संग्रहात, 'दोन वाजता', 'चुकला पक्षी धुसरवेळी', 'चेहरा व 'वाल्मिकी', आणि 'सीता' अशा एकूण चार एकांकिका आहेत. या एकांकिकांना 'प्रयोगानुकुल सामाजिक नाटिका' असे प्रारंभीच लेखिकेने म्हटले आहे.

'चारमिनार' या एकांकिकासंग्रहातील पहिलीच एकांकिका 'दोन वाजता' ही असून ती मरणोत्तर जीवनाचा व पारलौकिकाचा वेध घेणारी आहे. अतृप्त व्यक्ती आपली इच्छा पूर्ण करण्यासाठी मृत्यूनंतर आत्म्याच्या रूपाने येऊन, आपली इच्छा पूर्ण करून घेते, ही काहीशी असंभवनीय गोष्ट लेखिका रंगवून सांगताना दिसते. डॉ.जयारामचे एका तरुणीवर प्रेम असते, परंतु बेताच्या आर्थिक परिस्थिमुळे तिच्याशी विवाह करून संसारचे ओझे तो अंगावर ओढवून घेऊ इच्छित नाही. सदर तरुणीचे वडील हे तिच्या मनाविरुद्ध तिचा विवाह डॉ. कबऱ्याबरोबर लाऊन देतात. डॉ जयराम विरहाने व्याकूळ होतो आणि एक दिवस आत्महत्या करतो. आपल्या भावी पत्नीबरोबर विवाह करणाऱ्या डॉ.कबऱ्याना जिवंतपणी ठार मारणे डॉ. जयरामला जमले नसल्यामुळे मृत्यूनंतर रात्री दोन वाजता त्यांच्या घरी येऊन, गळा दाबून त्याला ठार मारतो.

प्रस्तुत एकांकिकेतील घटना ही अद्भूत असल्याने, तिच्यातून भीती हा भाव निर्माण होतो. लेखिकेने एकांकिकेत निर्मिलेली सृष्टी ही अद्भूतरम्य असल्याने तिच्यातून भीती हा भाव निर्माण होतो. प्रस्तुत एकांकिकेतील घटना ह्या दोन रात्री व रात्रीच्या दोन वाजता घडतात, त्यामुळे त्यावेळची भयानकता निर्माण करणाऱ्या आहेत. एका अद्भूतरम्य प्रसंगातून मानवी नातेसंबंधाचा सूक्ष्म वेध लेखिकेने प्रस्तुत एकांकिकेमधून घेतला आहे.

'चुकला पक्षी धुसरवेळी' ही वसुंधरा पटवर्धन यांची तीन अंक असलेली एकांकिकाच आहे. तिचे स्वरूप हे तीन अंकी असले, तरी त्यावरून ते नाटक ठरू शकत नाही. नाटक व एकांकिका यामधील भेद सांगताना वा.ल.कुलकर्णी म्हणतात, " एकांकिकेत असेच काहीतरी असले पाहिजे की, ज्यामुळे ती एकांकिकाच बनते, ती अनेकांकिका बनूच शकत नाही ...... नाटकात जीवनातील नानात्वाचे दर्शन घडवून, त्यातून एकत्व सूचित करण्याचा नाटककाराचा प्रयत्न असतो. एकांकिकेत अत्यल्प प्रमाणात नानात्वाचे दर्शन असते व त्यातून एकत्वच सूचित केलेले असते. परंतु हे नानात्व इतके अत्यल्प असते की, केवळ एकत्वचं आहे, असे पाहणाऱ्याला वाटते." [५] वरील भेद लक्षात घेता ही नाटिका, एकांकिकाच आहे, असे म्हणता येईल.

कुटुंबाच्या सुखासाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करणाऱ्या, परंतु शेवटी पश्चातापाने वेडी झालेल्या 'विमल' या प्रौढ कुमारिकेची शोकांतिका 'चुकला पक्षी धुसरवेळी' या एकांकिकेमधून लेखिकेने मांडली आहे. जयंत हा विमलचा प्रियकर असतो. तो विवाहासाठी बराच काळ तिच्या होकाराची वाट पाहतो. परंतु वडिलांच्या मृत्यूनंतर विमल विवाहापेक्षा कौटुंबिक जबाबदारीला प्राधान्य देते. जयंतच्या विवाहानंतर विमल जेव्हा त्याला पत्नीबरोबर पाहते तेव्हा ती दुखी होते. मनापासून पती म्हणून वरलेल्या विवाहित जयंताने

आपल्याशी विवाह करावा, अशी अपेक्षा व्यक्त करते. आयुष्यभर तत्वावर जगणारी विमल जयंत व त्याच्या पत्नीच्या दर्शनाने, ती तत्वे एका क्षणात धुळीस मिळविण्यास निघते. विवाहित प्रियकराबरोबर विवाह करू इच्छिणाऱ्या विमलला कायद्याची व जननिंदेची पर्वा वाटत नाही.

जयंतची पती म्हणून प्राप्ती न झालेली विमल भविष्यकाळात आपण विवाह करणार नाही, असा निश्चय करते. 'हिरकणी' या नाटकात विवाहसंस्था या बाह्य उपचारांना महत्व देणारी लेखिका या एकांकाकेत मात्र अंत:करणापासून केलेल्या प्रेमाला महत्व देताना दिसते.

चाळीस-पंचेचाळीस वर्षापूर्वीच्या मिळवत्या व अविवाहित प्रौढ कुमारीकांची व्यथा, लेखिका प्रस्तुत एकांकिकेमधून मांडताना दिसते. प्रौढ कुमारिकांच्या समस्या हा तत्कालीन कालखंडातील नवीन विषय नसला तरी तो ज्वलंत होता. कौटुंबिक कथानकामधून सामाजिक उकल करणाऱ्या वसुंधरा पटवर्धन ह्या सजग लेखिका होत्या, असे म्हणता येईल.

'चारमिनार' या एकांकिकासंग्रहातील 'चेहरा' ही वसुंधरा पटवर्धन यांची तिसरी एकांकिका आहे. संसार करण्यासाठी लागणारे उत्तम गुण स्त्रीच्या अंगी असले, तरी विवाह करताना पुरुष हे शक्यतो गुणांपेक्षा सौंदर्याला अधिक महत्व देतात, असा सामाजिक विषय घेऊन प्रस्तुत एकांकिका येताना दिसते. अंगी उत्तम गुण व संसार करण्याची इच्छा असूनही, केवळ कुरूपतेमुळे 'चेहरा' या एकांकिकेतील मथुरेच्या वाट्याला संसारसुख येत नाही. आपल्या अंगी असलेल्या गुणांचे कौतुक करणारा माधव हा तिचा मित्र केवळ सुंदर चेहरा असलेल्या स्त्रीबरोबर विवाह करून फसलेला पुरुष आहे. सौंदर्याला महत्त्व देऊन व गुणांकडे दुर्लक्ष करून विवाह केलेला माधव जेव्हा, मथुरेच्या गुणांची तारीफ करतो, तेव्हा त्याच्या मतलबी स्वभावाचा राग येऊन, मथुरा त्याला घराबाहेर हाकलून देते.

व्यक्तीच्या अंगी असणारे उत्तम गुण हे त्याचे रूप असते हे सहसा कोणाला न पटणारे सत्य लेखिका प्रभावीपणे मंडताना दिसते. केवळ सुंदर चेहरा सुखाचा संसार करू शकत नाही, तर त्यासाठी लागणारे गुण वेगळेच असतात, हा बोधवादी संदेश लेखिका देताना दिसते.

'वाल्मिकी आणि सीता' या एकांकिकेमधून लेखिकेने एका विवाहित पुरुषाच्या प्रेमात पडून फसलेल्या साळू नावाच्या तरुणीच्या जीवनाची कर्मकहाणी सांगितली आहे. स्त्री संरक्षण हा कोणत्याही काळातील महत्त्वाचा प्रश्न आहे. कायदे करून किंवा सहानुभूती वाटून हा प्रश्न कायमचा सुटत नाही, तर त्यासाठी पुरुषांच्या मानासिकतेमध्येच बदल होणे कसे आवश्यक आहे असे लेखिकेला वाटते. ज्या जगात रामासारखा एकनिष्ठ पती आणि संकटात सापडल्यानंतर आधार देणारा वाल्मिकीसारखा गुरु सापडत नाही, त्या जगात स्त्रीला सीता होता येणार नाही, हे सामाजिक प्रमेय लेखिका मंडताना दिसते.

विवाहित चित्रपट कथालेखक हा चित्रपटात काम करण्यासाठी आलेल्या हुशार परंतु दिशाहीन अविवाहित साळूला आपल्या प्रेमपाशात ओढतो. विविध प्रकारची आमिषे दाखवून तो तिच्याशी शारीरिक संबंध ठेवतो. परंतु साळू जेव्हा चार महिन्याची गरोदर राहते, तेव्हा मात्र तो आपली जबाबदारी टाळून तिला घराबाहेर हाकलून देतो. अशा कठीण प्रसंगामध्ये अनाथ साळूला मुलगी मानणारे चित्रे मास्तर आपली खोटी प्रतिष्ठा जपत तिला वाऱ्यावर सोडतात. पुराणकाळात अडचणीत सापडलेल्या व्यक्तींना आधार देणारे वाल्मिकीसारखेगुरु होते, परंतु आधुनिक काळात अशा व्यक्ती भेटणे दुरापस्त असल्याने, संकटात सापडलेल्या व्यक्तींना योग्य दिशा मिळत नाही. विविध वयोगटातील स्त्रियांच्या समस्या मांडणाऱ्या वसुंधरा पटवर्धन प्रस्तुत एकांकीकेमधून साळू या तरुणीची नाजूक समस्या मांडताना दिसतात.

एक नाटककार म्हणून वसुंधरा पटवर्धन यांचा फारसा लौकिक नसला, तरी नाटक या वाङ्मयप्रकाराची त्यांना बरीच जाण होती, असे म्हणता येईल. संहितेच्या अंगाने त्यांच्या नाट्यलेखनाचा विचार करता, त्यांच्या नाट्यलेखनाची कथाबीजे ही स्वतंत्र नसून, त्यांच्या काही कथांवरून त्यांनी घेतली आहेत. एक कथाकार म्हणून

E-ISSN : 2348-7143
Jan.-Mar.-2023

वसुंधरा पटवर्धन यांनी लक्षणीय यश संपादन केले असले, तरी त्यांना नाट्याच्या क्षेत्रात फारसे यश मिळाले नाही. स्वतःच्या मर्यादांची त्यांना जाणीव असल्यामुळेच की काय, त्यांनी नाट्यलेखनाकडे फारसे यश मिळाले नाही. स्वतःच्या मर्यादांची त्यांना जाणीव असल्यामुळेच की काय, त्यांनी नाट्यलेखनाकडे फारसे लक्ष दिले नाही. नाट्याच्या क्षेत्रात वसुंधराबाईचे उच्च स्थान नसले, तरी कथावाङ्मयातील त्यांच्या स्थानाला जराही धक्का पोहचत नाही, असे म्हणता येईल.

**संदर्भ :**


१. पटवर्धन वसुंधरा, हिरकणी, मुंबई १९६१, पृ.५१

२. पटवर्धन वसुंधरा, 'हिरकणी' , दोन शब्द, मुंबई, १९६१

३. फडके.ना.सी. 'प्रतिभा साधन', पुणे, १९६३, पृ. १९२

४. 'मराठी नाट्यतंत्र', संपा.ब्रम्हे. मो.द व इतर, पुणे १९६४, पृ. २८

५. कुलकर्णी. वा ल, 'वाङ्मयीन मते आणि मतभेद', मुंबई, पृ.९६